1. या प्रश्नपत्रिकेत - अ,ब,क,ड – असे चार विभाग आहेत.
2. सर्व विभाग आवश्यक आहेत.
3. यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
4. एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

## विभाग - 'अ' - वाचन व आकलन- 15 गुण

**प्रश्न 1) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

मित्रांनो, सृष्टीचे सहृदय मित्र बना. तृणपर्णावरचे दवबिंदू पाहा. ते मोती बघा आणि गवतातून कोळ्यांनी विणलेली जाळी! सूर्यकिरणांनी रंगलेली जणू सोनेरी मोत्यांच्या झालरी लावलेली परींची ती हवेवर डोलणारी नाजूक मंदिरे! बघा ती मौज आणि पहाटेच्या प्रशांत वेळी झाडांवरून थेंब पडतात. जणू अश्रू-ते ऐका. ते निळे डोंगर बघा; खोल दऱ्या, नद्या, नाले, तळी, वृक्षवेली, फुले, पाखरे-सारे पाहा. एखादे साधे फूल, परंतु किती सुंदर असते! टेनिसन म्हणाला, “एक फूल जाणणे म्हणजे विश्वच जाणणे!” फुला- पाखरांच्या अंगावरची नक्षी बघा. फुलपाखरांच्या मागे धावा. कोकिळेला शोधीत फिरा. घुबडांचे घुत्कार ऐका. नाचणारे मोर बघा. गायी,बैल, मांजरे, त्यांचे डोळे बघा-गंमत आहे.

खालचे वरचे सारे विश्व पाहा. आकाशातील रात्रीचे काव्य पाहा. वेदांतील ऋषींनी मध्यान्हीच्या निळ्या-निळ्या आकाशाचेही वर्णन केले आहे! आम्ही पहाटेचेही पाहणार नाही, मग मध्यान्हीचा धगधगीतपणा नि त्यातील प्रखर सौंदर्य पाहणे दूरच राहिले! तुम्हाला ताऱ्यांचे कधी आकर्षण वाटले आहे? निळ्या आकाशाने कधी तुम्ही वेडे झाला आहात? काजव्यांची कवाईत पाहिली आहे? प्रकाशाची कवाईत!

**प्रश्न 1) a) उतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा. (कोणतेही 3). (3×1= 3)**

I) लेखकाने वाचकांना सृष्टीचे कसे मित्र बनण्यास सांगितले आहे ?

A) लाडके B) खास C) सहृदय D) जवळचे

II) पहाटेच्या वेळी झाडावरून पडणाऱ्या थेंबांना लेखक कशाची उपमा देतात?

A) दवबिंदूंची B) अश्रूंची C) मंदिरांची D) मोत्यांची

III) 'आकाशातील रात्रीचे काव्य' म्हणजे ......................होय.

A) एखादे महाकाव्य B) रात्रीची शांतता

C) चंद्र, तारे यांनी प्रकाशित आकाश D) काळेभोर आकाश

IV) मध्यान्हीच्या आकाशाचे वर्णन ऋषींनी कोठे केले आहे?

A) वेदांमध्ये    B) काव्यात    C) ग्रंथात    D) सृष्टीमध्ये

**b) खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा. (कोणतेही 3).** (3×1 = 3)

I) लेखक गवतातील कोळयांच्या जाळ्यांविषयी काय म्हणतात?

II) लेखकाने आपल्याला कोणते विश्व पाहायला सांगितले आहे?

III) टेनिसनच्या मते एक फूल जाणणे म्हणजे काय ?

IV) लेखक कोणत्या दृश्याला प्रकाशाची कवाईत असे म्हणतात?

**c) उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तर लिहा. (कोणतेही-1)** (2×1 = 2)

I) निसर्गातील गंमत अनुभवण्यासाठी लेखक आपल्याला कोणता सल्ला देतात?

II) वरील उताऱ्यात लेखक आकाशाविषयी कोणती माहिती देतात ?

**प्रश्न-२ -खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अपयश ही यशाची पहिली पायरी असते
जीवनातल्या अनुभवांची डायरी असते

त्यातूनच प्रत्येकाचे घडत जाते भविष्य
मग कळून येते किती सुंदर आहे आयुष्य

प्रयत्नांच्या बळावर सर करता येते शिखर
'लाथ मारेन तिथे पाणी काढेन' ही ठेवा जिगर

कुठल्या समस्येला नाही आत्महत्या हा पर्याय
सदा पुढेच जायचे संकटावर ठेवून पाय

नापास होणं म्हणजे नाही आभाळ कोसळणं
जीवन म्हणजे असतं निरंतर शिकणं

परीक्षा नाही ठरवू शकत आयुष्याचे मोल
अंगी बाणवावी कला अन् सावरावा तोल

दुर्गम कडा भेदण्याची ठेवा दुर्दम्य अभिलाषा
मग येणारच नाही तुमच्याजवळ निराशा

**प्रश्न 2 a) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही 3).** **(3×1= 3)**

I) अपयशाला कवीने कशाची उपमा दिली आहे?

A) आयुष्याची B) अनुभवांच्या डायरीची C) पायरीची D) भविष्याची

II) 'आभाळ कोसळणे' वाक्प्रचाराचा अर्थ काय ?

A) पाऊस पडणे B) विजा चमकणे C) अपयशी ठरणे D) संकट येणे

III) 'सतत, अखंड' या अर्थाचा कवितेत आलेला शब्द कोणता ?

A) सर करणे B) निरंतर C) मोल D) दुर्गम

IV) कवीने सर्वांना आयुष्याचा तोल सावरण्यासाठी काय करण्याचा सल्ला दिला आहे?

A) ठाम उभे राहण्याचा B) मेहनत करण्याचा

C) एखादी कला अंगी जोपासण्याचा D) अभ्यास करण्याचा

**b) कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 4).** **(4×1 = 4)**

I) कवीने सर्वांना कोणती जिगर ठेवण्याचे आवाहन केले आहे?

II) कोणत्याही समस्येला जीवनात कोणता पर्याय कधीच असत नाही ?

III) आपल्या जवळ कधीही निराशाही येऊ नये म्हणून माणसाने काय करावे?

IV) कशाच्या मदतीने शिखर सर करता येते?

V) 'इच्छा' या अर्थाचा कवितेत आलेला शब्द कोणता?

## विभाग - 'ब' - व्याकरण - 20 गुण

**प्रश्न 3) a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 4)** **(4×1 =4)**

I) खालीलपैकी भाववाचक नामाचा योग्य पर्याय कोणता ?

A) विश्वास B) धवल C) गंगा D) वारा

II) खालीलपैकी योग्य विधाने कोणती ?

अ) नाम म्हणजे वस्तू किंवा पदार्थाचे नाव होय.

ब) नाम म्हणजे वास्तव किंवा काल्पनिक वस्तूंचे नाव होय.

क) नाम म्हणजे प्राणी, व्यक्ती यांची नावे व त्यांच्या अंगी असणारे गुण होय.

ड) नाम म्हणजे वस्तूविषयी विशेष माहिती सांगणारा शब्द होय.

A) विधान 'अ' आणि 'ब' बरोबर B) विधान 'ड' बरोबर

C) विधान 'ब' बरोबर D) विधान 'अ', 'ब', 'क' बरोबर

III) खालीलपैकी गटात न बसणारे वाक्य कोणते ?

A) देशासाठी वीरांनी प्राणार्पण केले. B) गावाबाहेर जत्रा भरली.

C) गोगलगाय हळू चालते. D) सूर्य ढगामागे लपतो.

IV) खालील वाक्यात रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्ययाचा पर्याय वापरा.

आईला थोडे बरे नाही, ________ सर्व ठीक.

A) आणि B) की C) किंवा D) बाकी

V) वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

गणेश <u>गटागटा</u> दूध पितो.

A) क्रियाविशेषण अव्यय B) विशेषण

C) केवलप्रयोगी अव्यय D) क्रियापद

**b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3).** **(3×1=3)**

I) तुला परीक्षेत चांगले यश मिळेल. - वाक्याचा काळ ओळखा.

II) विशाखा पुस्तक वाचत आहे. – भूतकाळातील वाक्य तयार करा.

III) पृथ्वी सूर्याभोवती फिरते. - वाक्याचा काळ ओळखा

IV) माणसाने भूतदया अंगी बाणवावी. – वर्तमानकाळातील वाक्य बनवा.

**c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3)** **(3×1=3)**

I) मुलांच्या अभ्यासाची काळजी नको का? - विधानार्थी वाक्य बनवा.

II) राघव जबाबदार मुलगा आहे. - विधानार्थी नकारात्मक वाक्य बनवा.

III) देवा, सर्वांना सुखी ठेव !- वाक्याचा प्रकार ओळखा.

IV) निसर्गाला कुठलाही धर्म नाही. - प्रश्नार्थक वाक्य बनवा.

**d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1 = 2)**

I) खालीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द कोणता ते ओळखा.

कागद , वाट , दिवस, पुरूष

II) <u>स्त्री</u> गाणे गाऊ लागली. - अधोरेखित शब्दाच्या वचनामध्ये बदल करून वाक्य पुन्हा लिहा.

III) तारीख - या शब्दाच्या अनेकवचनाचा शब्द लिहा.

**प्रश्न 4) a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1=2)**

I) खालीलपैकी भिन्नलिंगी शब्दाचा योग्य पर्याय ओळखा.

A) कालवड B) वाघ C) वानर D) बोका

II) लिंग विचारानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा.

A) पगडी B) फेटा C) टोप D) मुकुट

III) पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द कोणता ?

A) झरा B) समुद्र C) नदी D) धबधबा

**b) सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1=2)**

I) खालीलपैकी समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ?

A) अरण्य- रान B) उदक - उदय C) शिर- नयन D) पर्ण - चरण

II) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता?

A) पुत्र B) तनया C) सुत D) मुलगा

III) खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

A) मुख B) सोंड C) वदन D) तोंड

**c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1= 2)**

I) खालीलपैकी विरुद्धार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती ?

A) आशा ×निराश B) उद्योगी× आळस C) कठोर ×कठीण D) सोय × गैरसोय

II) 'नि:शस्त्र ' या शब्दाच्या विरुद्ध अर्थाचा योग्य शब्द निवडा.

A) शस्त्र B) सशस्त्र C) बिनशस्त्र D) हत्यार

III) 'स्वतंत्र' या शब्दाच्या विरुद्ध अर्थाचा योग्य शब्द निवडा.

A) पारतंत्र्य B) मुक्त C) परतंत्र D) स्वच्छंद

**d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1=2)**

I) खालीलपैकी समास प्रकारांच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता ?

A) बेमालूम B) आजन्म C) नवरात्र D) दिवसेंदिवस

II) या समासाचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचा समावेश केलेला असतो अशा समासाला________समास असे म्हणतात.

A) समाहार द्वंद्व B) इतरेतर द्वंद्व C) वैकल्पिक द्वंद्व D) द्विगू

III) खालील शब्दाचा समास ओळखा.

'सत्यासत्य' -

A) इतरेतर द्वंद्व B) वैकल्पिक द्वंद्व C) समाहार द्वंद्व D) अव्ययीभाव

## विभाग – क- पाठ्यपुस्तक आधारित - गुण 30

**प्रश्न-5- a) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही -3)** **(1x3=3)**

I) सतत सन्मान केला गेला तर कोणता धोका निर्माण होतो, असे लेखकाला वाटते?

II) वजन कमी करण्यासाठी न बोलण्याचा उपाय पंतांना का जमणार नव्हता?

III) तपोवनातील स्त्रियांना अब्दुल कशासारखा वाटायचा?

IV) खेतवाडीच्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांमध्ये कोणता वेगळेपणा होता.

V) कोणतीही कलाकृती कधी उत्तम होऊ शकते?

**b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही -3)** **(3x1=3)**

I) पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी _______ प्रसंग आला.

A) व्रतभंगाचा B) उपासाचा C) कठीण D) अवघड

II) रामानं सेतुबंधन केलं, पण त्यासाठी अनेकांचा _________ लागला.

A) सल्ला B) पाठिंबा C) हातभार D) मदत

III) या ______ झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी उजळ होतील.

A) घनदाट B) हिरव्यागर्द C) भल्यामोठ्या D) अवाढव्य

IV) आयुष्याचं फार मोठं ________ मला भावे सरांच्या या शिकवणुकीतून गवसलं.

A) तत्त्वज्ञान B) ज्ञान C) स्वप्न D) दृश्य

V) __________रस मला अमृतासारखा वाटू लागला .

A) लिंबाचा B) उसाचा C) मोसंबीचा D) संत्र्यांचा

**c) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे ४० ते ५० शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही-1)** **(3x1=3)**

I) तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.

II) पंतांच्या उपासाबाबत त्यांच्या पत्नीचा अवर्णनीय उत्साह तुमच्या शब्दांत वर्णन करा.

III) दुसऱ्याला मदत करण्यातला आनंद ज्याप्रसंगातून मिळू शकतो, असा प्रसंग लिहा.

**d) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यांमधील योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** **(5x1=5)**

(अंगाचा तिळपापड होणे, गलका करणे, सुरुंग लावणे, मळमळ व्यक्त करणे, रममाण होणे, झोकून देणे)

I) देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी चळवळीत पूर्णपणे सहभागी घेतला.

II) गाण्याच्या मैफिलीत सर्व श्रोते मग्न झाले होते.

III) दुकानाचे झालेले नुकसान पाहून राघवला संताप आला.

IV) मुलांचा किल्ला करण्याचा बेत अचानक आलेल्या पावसाने उधळवून लावला.

V) पंचानी दिलेल्या निर्णयाबद्दल सर्व खेळाडूंनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

**b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही -4)** **(4x1=4)**

I) अग्निमाजि पडे बाळू । माता धांवे ________ ॥

A) दयाळू B) कनवाळू C) मायाळू D) कृपाळू

II) दुनियेचा विचार _______ केला, अगा जगमय झालो |

A) कायम B) नेहमी C) क्वचित D) हरघडी

III) तुझ्या ___________ त्याची केवढीशी शान

A) पराक्रमापुढे B) शौर्यगाथेपुढे C) जिद्दीपुढे D) वीरतेपुढे

IV) भविष्य __________ या देशाचे करूया जय-जयकार|

A) उज्ज्वल B) सुंदर C) महान D) भव्य

V) झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे __________छान शेकले.

A) आयुष्य B) जीवन C) मन D) शरीर

**c) खालीलपैकी काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. (कोणतेही -1)** **(1x3 =3)**

I) 'अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण.'

II) वणवा लागलासे वनीं।
पाडस चिंतीत हरणी ॥

**प्रश्न-7 - a) खालीलपैकी प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही -3) (3x1=3)**

I) बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झाल्यानंतर लेखकाला कोणते काम करायला सांगण्यात आले?

II) व्युत्पत्तीकोश निर्मितीचा ठराव कधी पास झाला?

III) बार्क या संस्थेच्या नावाचे विस्तारित रूप लिहा.-

IV) 'दार' हा प्रत्यय कोणत्या भाषेतून मराठीत आला आहे?

**प्रश्न-7- b) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे ४० ते ५० शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही-1)**

**(1x2 =2)**

I) व्युत्पत्ती कोशाची कार्ये थोडक्यात लिहा.

II) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते?

## विभाग-ड लेखन - गुण 15

**प्रश्न-8 - a) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २००-२५० शब्दांत निबंध लिहा. (1x6 =6)**

I) रंगपेटीतील रंगाचे मनोगत-

रंग पेटीतील इतर रंगांशी असलेली मैत्री - होणारे भांडण- मुलांकडून होणारा गैरवापर - तुकडे पडणे - मुलांना चित्रात रंग भरताना मिळणारा आनंद-जीवनाचे सार्थक

**किंवा** (OR)

मी पक्षी झालो तर –

पंखांमुळे मिळणारा आनंद - एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे सोपे - पैसे न खर्च करता सर्वत्र मुक्त संचार - विविध ठिकाणे पाहणे - वर्गात बसण्याच्या बंधनातून मुक्ती - अभ्यास न करण्याची सवलत - लोकांच्या मदतीसाठी प्रयत्न करणे - आकाशात पक्ष्यांबरोबर स्पर्धा करता येणे

**किंवा** (OR)

आमच्या शाळेतील स्नेहसंमेलन –

मुलांसाठीचा उत्साहाचा दिवस -एखाद्या विशिष्ट संकल्पनेवर आधारित स्नेहसंमेलन- विविध गुणदर्शन - नाट्य, नृत्य, संगीत, विविध कलांचे सादरीकरण - मुलांचे उत्साही चेहरे- पालकांना झालेला आनंद - विद्यार्थ्यांचा सभाधीटपणा - शिक्षक, मुख्याध्यापक, पालक सर्वांकडून झालेले कौतुक

**b) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.कथेला शीर्षक द्या व तात्पर्य लिहा.( कोणतेही -1 )**

**(1x5 =5)**

छोटेसे खेडे- एक गरीब शेतकरी पतीपत्नी - दोन बैल- पोटाला पुरेशी शेती- एक बैल चोरीला- दुसऱ्यादिवशी आठवडे बाजारात- बाजारात बैल......पत्नीची हुशारी.......... दोन्ही डोळे चांगले............चोराची कबुली.पतीपत्नी बैलाला घेऊन घरी.....तात्पर्य

**किंवा (OR)**

एक राजा- राज्यातील लोक आळशी-त्यांना उद्योगी बनवण्याचा विचार- रस्त्यात मोठा दगड ठेवणे- खाली लहानशी पिशवी ठेवणे- अनेक लोकांचे बाजूने जाणे पण दगड बाजूला न ठेवणे- एक गरीब माणूस दगड बाजूला करतो- पिशवी मिळते- त्यात सोन्याची नाणी बाजूला 'बक्षीस' अशी चिठ्ठी - बाकीच्या लोकांना पश्चात्ताप -लोक उद्योगी बनतात

**c) खालील विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (कोणतेही -1) (1x4=4)**

तुम्ही रमा / रमेश देवकर , कुमठेकर मार्ग,पेरुगेट.पुणे-404430, रहिवाशी आहे. तुमच्या भागातील कचराकुंडीतील कचरा खूप दिवस उचललेला नाही त्यामुळे सगळीकडे दुर्गंधी पसरलेली आहे. यासंबंधी महापालिकेच्या अधिकाऱ्याकडे तक्रार करणारे पत्र लिहा.

**किंवा (OR)**

वनिता/ विनोद शहापुरे , महात्मा गांधी विद्यालय, कोल्हापूर येथून शाळेचे क्रीडाविभाग प्रमुख या नात्याने शाळेच्या क्रीडाविभागासाठी क्रीडासाहित्याची मागणी करणारे पत्र अमर स्पोर्ट्स, शिवाजीनगर, पुणे- 400011 च्या व्यवस्थापकास लिहा.

C

## विभाग - 'अ' - वाचन व आकलन- 15 गुण

**प्रश्न 1) खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**प्रश्न 1) a) उतारा वाचून त्याआधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा.(कोणतेही 3) (3×1= 3)**

I) C) सहृदय

II) B) अश्रूंची

III) C) चंद्र, तारे यांनी प्रकाशित आकाश

IV) A) वेदांमध्ये

**प्रश्न 1) b) खालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे एका वाक्यात लिहा. (कोणतेही 3) (3×1 = 3)**

I) लेखक गवतातील कोळ्यांच्या जाळ्यांविषयी सूर्यकिरणांनी रंगलेली जणू सोनेरी मोत्यांच्या झालरी लावलेली परींची हवेवर डोलणारी नाजूक मंदिरे असे म्हणतात.

II) लेखकाने आपल्याला खालचे वरचे सारे विश्व पाहा असे सांगितले आहे. म्हणजेच निसर्ग आणि आकाश बारकाईने पाहण्यास सांगितले आहे.

III) टेनिसनच्या मते "एक फूल जाणणे म्हणजे सारे विश्वच जाणणे" .

IV) लेखक काजव्यांच्या चमकण्याच्या दृश्याला प्रकाशाची कवाईत असे म्हणतात.

**प्रश्न 1 c) उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तर लिहा.(को.1) (2×1 = 2)**

I) लेखकाने आपल्याला दवबिंदू, कोळ्यांची जाळी, निळे डोंगर, खोल दऱ्या, नद्या, नाले ,तळी, वृक्षवेली, फुले, पाखरे, फुलपाखरांच्या अंगावरील नक्षी, नाचणारे मोर, गायी, बैल, मांजरे यांचे डोळे,. फुलपाखरांच्या पंखांवरील नक्षी पाहण्यास सांगितले आहे. कोकिळेला शोधत फिरायचा सल्ला दिला आहे. घुबडांचे घूत्कार ऐकायला सांगितले आहे.रात्रीचे आकाश पाहायला सांगितले आहे. काजव्यांची कवाईत पाहायला सांगितले आहे .

II) लेखक आपल्याला निसर्गाचा मित्र बनण्याचा सल्ला देताना निसर्गातील मौजमजांबरोबरच आकाशातील रात्रीचे दृश्य पाहायला सांगतात. आपल्या ऋषीमुनींनी वेदांमध्ये दुपारच्या निळ्या आकाशाचे वर्णन केले आहे. लेखक म्हणतात की आपण सर्वजण पहाटेचेही आकाश पाहत नाही तर दुपारचे धगधगीत आणि प्रखर आकाश आपण कधी पाहणार? आपल्याला तारयांचे आकर्षण वाटले पाहिजे असे त्यांना वाटते.

**प्रश्न 2 a) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही 3).** **(3×1= 3)**

I) B) अनुभवांच्या डायरीची

II) D) संकट येणे

III) B) निरंतर

IV) कवीने सर्वांना आयुष्याचा तोल सावरण्यासाठी काय करण्याचा सल्ला दिला आहे?
C) एखादी कला अंगी जोपासण्याचा

**प्रश्न 2) b) कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही 4)** **(4×1 = 4)**

I) कवीने सर्वांना 'लाथ मारेन तिथे पाणी काढेन'अशी जिगर ठेवण्याचे आवाहन केले आहे.

II) कोणत्याही समस्येला जीवनात आत्महत्या पर्याय कधीच असत नाही.

III) आपल्या जवळ कधीही निराशाही येऊ नये म्हणून माणसाने दुर्गम कडा भेदण्याची दुर्दम्य अभिलाषा ठेवावी.

IV) प्रयत्नांच्या मदतीने शिखर सर करता येते.

V) 'इच्छा' या अर्थाचा कवितेत आलेला शब्द - अभिलाषा.

**विभाग - 'ब' - व्याकरण - 20 गुण**

**प्रश्न 3) a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 4)** **(4×1 =4)**

I) A) विश्वास

II) A) विधान 'अ', 'ब', 'क' बरोबर.

III C) गोगलगाय हळू चालते.

IV) D) बाकी

V) A) क्रियाविशेषण अव्यय

**प्रश्न 3 b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3).** **(3×1=3)**

I) भविष्यकाळ.

II) विशाखा पुस्तक वाचत होती. /विशाखाने पुस्तक वाचले होते / विशाखाने पुस्तक वाचले. /विशाखा पुस्तक वाचत असे.

III) वर्तमानकाळ.

III) माणसाने भूतदया अंगी बाणवली आहे. / माणूस भूतदया अंगी बाणवतो./ माणूस भूतदया अंगी बाणवत आहे/ माणूस भूतदया अंगी बाणवत असतो.

**प्रश्न 3) c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 3)** **(3×1=3)**

I) मुलांच्या अभ्यासाची काळजी जरूर/ नक्की/ निश्चितच घ्यायला हवी.

II) राघव बेजबाबदार मुलगा नाही.

III) आज्ञार्थी वाक्य.

IV) निसर्गाला कुठला आला आहे धर्म ? निसर्गाला कोणता धर्म असतो का ?/निसर्गाला कोणताही धर्म नाही ना?

**प्रश्न 3) d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1 = 2)**

I) वाट

II) स्त्रिया गाणे गाऊ लागल्या.

III) तारखा.

**प्रश्न 4) a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1=2)**

I) A) कालवड

II) A) पगडी

III) C) नदी

**प्रश्न,4) b) सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1=2)**

I) A) अरण्य- रान

II) B) तनया

III) B) सोंड

**प्रश्न 4)c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1= 2)**

I) D) सोय × गैरसोय

II) B) सशस्त्र

III) C) परतंत्र

**प्रश्न 4) d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही 2)** **(2×1=2)**

I) C) नवरात्र

II) A)समाहार द्वंद्व

III) B) वैकल्पिक द्वंद्व.

**विभाग - 'क' - पाठ्यपुस्तक आधारित - 30 गुण.**

**प्रश्न-5) a) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही -3)** **(3x1=3)**

I) सतत सन्मान केला गेला तर एक शालीन जग गमावून बसण्याचा धोका असतो.

II) वजन कमी करण्यासाठी न बोलण्याचा उपाय पंतांना जमणार नव्हता कारण ते टेलिफोन ऑपरेटर होते.

III) तपोवनातील स्त्रियांना अब्दुल देवदूतासारखा वाटायचा.

IV) खेतवाडीच्या प्राथमिक शाळेतील शिक्षक परिस्थिती बेताची असली तरी मनाने खूप श्रीमंत होते.

V) मूळ कथा दर्जेदार असेल तरच कोणतीही कलाकृती उत्तम होऊ शकते.

**प्रश्न 5) b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही 3).** **( 3×1=3)**

I) A) व्रतभंगाचा

II) C) हातभार

III) B) हिरव्यागर्द

IV) A) तत्त्वज्ञान

V) A) लिंबाचा

**प्रश्न 5) c) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांची 40 ते 50 शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही-1) (3x1=3)**

I) मुले कोणत्याही एका साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये लेखक याविषयी पाठ्यपुस्तका आधारे माहिती लिहू शकतात. शुद्धलेखनाला अनुसरून गुणदान करावे.

II) पंतांच्या उपासाबाबत त्यांच्या पत्नीचा उत्साह- उकडलेल्या भाज्या खाऊ घालणे - सडपातळ भाज्यांचा खुराक चालू - बाळसेदार भाज्यांची स्वयंपाक घरातून हकालपट्टी- बिनसाखरेचा चहा - अशा मुद्द्यांच्या आधारे लेखन.

III) दुसऱ्याला मदत करण्यातला आनंद - स्वमतावर आधारित प्रश्न असल्यामुळे मुले त्यांच्या विचारानुसार व्यक्त होतील. विचारांमधील सुसूत्रता, प्रश्नाच्या आशयानुसार लिखाण पाहून गुणदान करावे.

**टीप : धडा व लेखक यांचा उल्लेख आवश्यक. शुद्धलेखनाला अनुसरून गुणदान करावे.**

**प्रश्न 5) d) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यामधील योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** **(5x1=5)**

(अंगाचा तिळपापड होणे,गलका करणे,सुरुंग लावणे, मळमळ व्यक्त करणे,रममाण होणे, झोकून देणे )

I) देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी चळवळीत स्वतःला झोकून दिले.

II) गाण्याच्या मैफिलीत सर्व श्रोते रममाण झाले होते.

III) दुकानाचे झालेले नुकसान पाहून राघवच्या अंगाचा तिळपापड झाला.

IV) मुलांच्या किल्ला करण्याच्या बेताला अचानक आलेल्या पावसाने सुरुंग लावला.

V) पंचांनी दिलेल्या निर्णयाबद्दल सर्व खेळाडूंनी तीव्र मळमळ व्यक्त केली.

**टीप - वाक्प्रचारांचा वाक्यात वापर करताना वाक्यात योग्य तो बदल केला असल्यास मुलांना पूर्ण गुणदान करावे**

**प्रश्न 6- a)खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या. (कोणतेही 4 )** **(4x1=4)**

I) संत नामदेवांनी स्वतःला परमेश्वराचे दास म्हटले आहे.

II) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट म्हणजे त्यांचे दोन हात.

III) युद्धाच्या वेळी समोरून तोफ गोळ्यांचा, बंदुकांच्या गोळ्यांचा वर्षाव होत असतानाही सैनिक न घाबरता आगेकूच करत राहतो म्हणून कवयित्रीला सैनिकाचे पाऊल जिद्दीचे वाटते.

IV) 'स्वप्न करू साकार' या कवितेत कवीला सर्वत्र चैतन्याचे सुदर्शन फिरत असलेले जाणवते.

V) दुःखाच्या प्रसंगात आलेले अश्रू हेच कवीचे सर्वात जवळचे मित्र होते.

VI) संत नामदेवांनी परमेश्वराला म्हणजेच पांडुरंगाला मेघाची उपमा दिली आहे.

**प्रश्न 6 b) खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्दाचा पर्याय शोधून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही 4)** **(4x1 =4)**

I) अग्निमाजि पडे बाळू | माता धांवे कनवाळू ||

II) दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो

III) तुझ्या शौर्यगाथेपुढे त्याची केवढीशी शान

IV) भविष्य उज्वल या देशाचे करूया जयजयकार.

V) झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले.

**प्रश्न 6 c) खालीलपैकी एका काव्यपंक्तीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ( कोणतेही 1)** **(1x3 =3)**

I) **संदर्भ-** 'औक्षण' या कवितेत कवयित्री इंदिरा संत सीमेवर लढायला जाणाऱ्या जवानांना संबोधून त्यांचे औक्षण करताना या काव्यपंक्ती वापरत आहे.

**स्पष्टीकरण -** सीमेवर शत्रूच्या माऱ्याचा सामना करत असतानाही सैनिक न डगमगता लढत राहतो. या सैनिकांमुळेच सर्वसामान्य जनता शांततेत जीवन व्यतीत करते. सैनिकाच्या पराक्रमापुढे सर्वसामान्य माणसाचे जीवनही खूप शुल्लक आहे. याची सर्व भारतीय जनतेला जाणीव आहे, म्हणूनच ते सर्व मिळून

सैनिकाच्या विजयाची कामना करतात. त्याच्या विजयी होऊन परतण्याची वाट पाहतात. त्यांचे अश्रू भरले डोळे म्हणजे जणू सैनिकाचे औक्षण करण्यासाठी पेटवलेल्या वातीच आहेत अशी कल्पना करून कवयित्री म्हणतात की सर्वसामान्य जनतेकडून हेच तुझे औक्षण आहे.
ही अष्टाक्षरी छंदातील एक भावोत्कट कविता आहे.

II) **संदर्भ -** संत नामदेव 'अंकिला मी दास तुझा' या अभंगातून परमेश्वर कृपेची याचना करत आहेत.
**स्पष्टीकरण** - संत नामदेव स्वतःला परमेश्वराचा दास म्हणवतात आणि त्याच्या दर्शनाची विनंती करताना विविध उदाहरणातून परमेश्वराचे व स्वतःचे नाते व्यक्त करतात. वनात वनवा लागल्यावर जशी एखादी हरणी पाडसाच्या चिंतेत त्याचा सर्वत्र शोध घेत राहते,स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पाडस सुरक्षित राहावे म्हणून प्रयत्न करते, तसेच संत नामदेव स्वतः परमेश्वराचे भक्त आहेत आणि परमेश्वराने या भक्ताच्या संकटात , कठीण प्रसंगात त्याला वाचवण्यासाठी धाव घ्यावी अशी ते परमेश्वराकडे विनंती करतात.

परमेश्वराचे आणि भक्ताचे नाते हे आई मुलासारखेच पवित्र आहे हे दर्शवताना संत नामदेवांनी दृष्टांत अलंकाराचा वापर केला आहे.

**टीप - विद्यार्थ्यांनी संदर्भासहित स्पष्टीकरण स्वत:च्या शब्दांत पूर्ण मुद्द्यांच्या आधारे लिहिले असल्यास पूर्ण गुणदान करावे. शुद्धलेखनाच्या आधारे गुणदान केले जावे.**

**प्रश्न 7 a) खालील प्रश्नांची उत्तरे एक वाक्यात लिहा. (कोणतेही -3) (3x1=3)**

I) बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झाल्यानंतर लेखकाला मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करायला सांगण्यात आलं.

II) व्युत्पत्तीकोश निर्मितीचा ठराव १९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या दरम्यान पास झाला.

III)बार्क या संस्थेच्या नावाचे विस्तारित रूप - भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर म्हणजेच भाभा अनुसंशोधन केंद्र.

IV) 'दार' हा प्रत्यय फारसी भाषेतून मराठीत आला आहे.

**प्रश्न 7 b) खालीलपैकी कोणतेही एका प्रश्नाचे 40 ते 50 शब्दांत उत्तर लिहा. (कोणतेही 1) (1x2 =2)**

I) व्युत्पत्ती कोशाची कार्ये - शब्दाचे मूळ रूप दाखवणे, अर्थांतील बदल स्पष्ट करणे, उच्चारातील बदल व फरक दाखवणे, बदलांचे कारण स्पष्ट करणे इत्यादी आहेत.

II) स्वतःचे काम स्वतः निर्माण करावे. आपल्याला काय करायचे आहे ते स्वतःच ठरवावे. बॉसने सांगितले तेवढेच काम केले सांगितले नाही तर आपल्याला कामच नाही असे समजणे ही प्रवृत्ती गेली पाहिजे. हा होमी भाभानी दिलेला सल्ला ऐकून त्यानुसार वागले तर 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती निर्माण होते.

## विभाग-ड - लेखन - 15 गुण

**प्रश्न-8 - a) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 200 ते 250 शब्दांत निबंध लिहा. (कोणताही 1)** **(1x6 =6)**

निबंधात खालील गोष्टींवर लक्ष द्यावे -

* विषय ज्ञान तर्कशक्ती व त्याची सलग मांडणी
* मुद्देसूदपणा
* आकर्षक आरंभ व शेवट
* म्हणी, वाक्प्रचार, काव्यपंक्ती यांचा योग्य वापर

* आकर्षक आरंभ व शेवट
* म्हणी, वाक्प्रचार, काव्यपंक्ती यांचा योग्य वापर
* हस्ताक्षर व शुद्धलेखन
* विरामचिन्हांचा यथायोग्य वापर
* उपयोजन कौशल्य / समर्पक शेवट.

**टीप - वरील सर्व घटकांचा सारासार विचार करून गुणदान करावे**

**प्रश्न 8 b) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.कथेला शीर्षक द्या व तात्पर्य लिहा.(कोणतीही 1).** **(1x5 =5)**

कथालेखनात खालील गोष्टींवर लक्ष द्यावे-

*शीर्षक

*विषयाची योग्य मांडणी, मुद्देसूदपणा व कल्पकता

*आकर्षक प्रारंभ व शेवट रंजकता

*म्हणी वाक्प्रचार यांचा योजकतेने वापर

*आकर्षक शैली व संवाद

*विरामचिन्हांचा यथायोग्य वापर

*तात्पर्य

**टीप - वरील सर्व घटकांचा सारासार विचार करून गुणदान करावे.**

**प्रश्न 8 c) खालीलपैकी कोणत्याही विषयावर पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (कोणतेही 1)** **(1x4=4)**

पत्रलेखनासाठी खालील गोष्टींवर लक्ष द्यावे.

दिनांक पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात लिहावा.

मायना- ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे संबोधित करावे.

विषय- मोजक्या शब्दात असावा

मजकूर- मजकूर विषयाशी संबंधित प्रोटक व नेमका असावा. समर्पक, मुद्देसूद रचना, पाल्हाळ नसावा. भाषा व्यावहारिक व भारदस्त असावी.

शेवट व स्वाक्षरी- पत्राचा शेवट करताना डावीकडील कोपऱ्यात पत्र पाठवणाऱ्याची स्वाक्षरी व पत्ता असावा.